महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक – ३१५१/४८ दिनांक :- २८ ऑगस्ट, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा मुंबई मंडळ सोडतीतील ३७० सदनिकांच्या विक्री किंमतीत १० ते २५ टक्क्यांपर्यंत कपात - गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे

मुंबई मंडळ सोडतीकरिता ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृतीसाठी १९ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

म्हाडाच्या 'श्री आणि श्रीमती निवासी' शुभंकर चिन्हाचे गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांच्या हस्ते अनावरण

मुंबई, दि. २८ ऑगस्ट, २०२४ : म्हाडा मुंबई मंडळातर्फे मुंबईतील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित संगणकीय सोडतीतील विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) व ३३ (७) व ५८ अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पातून म्हाडाला विकासकांकडून प्राप्त झालेल्या म्हाडाच्या हिश्श्यातील गृहसाठ्यापैकी ३७० सदनिकांच्या विक्री किंमती सुमारे १० ते २५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात येत असल्याची माहिती राज्याचे गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांनी आज दिली.

आधुनिक तंत्रज्ञान युगामध्ये म्हाडाच्या केंद्रस्थानी असलेल्या नागरिकांशी जनसंवाद प्रामुख्याने सुलभ व पारदर्शक राहावा, या उद्देशाने म्हाडातर्फे निर्माण करण्यात आलेल्या 'श्री आणि श्रीमती निवासी' या शुभंकर चिन्हाचे (Mascot) अनावरण गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांच्या हस्ते आज म्हाडा मुख्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान श्री. सावे बोलत होते.

पुनर्विकास प्रकल्पातून विकासकांकडून म्हाडाला गृहसाठा म्हणून प्राप्त झालेल्या ३७० सदनिका संगणकीय सोडत प्रणालीतून विक्रीसाठी जाहीर करण्यात आल्या आहेत. यातील अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांच्या किंमती २५ टक्क्यांनी कमी करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले तसेच अल्प उत्पन्न गटातील सदनिकांच्या किंमती २० टक्क्यांनी, मध्यम उत्पन्न गटातील सदनिकांच्या किंमती १५ टक्क्यांनी, उच्च उत्पन्न गटातील सदनिकांच्या किंमती १० टक्क्यांनी कमी करण्यात आल्याचे श्री. सावे यांनी सांगितले. यानुसार सुधारित किंमती मुंबई मंडळाद्वारे लवकरच म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावरून तसेच प्रसिद्धी पत्रकांद्वारे जाहीर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. सावे यांनी पुढे सांगितले की, आज किंमतींमध्ये जाहीर बदलांच्या अनुषंगाने म्हाडा सोडतीत अधिकाधिक नागरिकांना सहभाग घेण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून मुंबई मंडळ सदनिकांच्या विक्रीसाठी सुरू असलेल्या ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला दि. १९ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याची घोषणा श्री. सावे यांनी याप्रसंगी केली.
संगणकीय सोडतीच्या वेळापत्रकामध्ये झालेल्या बदलामुळे प्राप्त अर्जाच्या संगणकीय सोडतीचा दिनांक व ठिकाण मंडळातर्फे लवकरच जाहीर केले जाईल, असेही श्री. सावे यांनी सांगितले.

म्हाडाच्या नूतन शुभंकरचे म्हाडा परिवारात स्वागत करताना श्री. सावे म्हणाले की, हे शुभंकर म्हणजे म्हाडाकरिता शुभेच्छा दूत प्रमाणेच भूमिका निभावणार आहेत. म्हाडा हे एक लोकाभिमुख कार्यालय असल्याने अनेक नागरिक या म्हाडाच्या विविध कार्यप्रणालीस भेट देत असतात. अशावेळी म्हाडाच्या कार्यप्रणालीची ओळख व

मार्गदर्शन मिळविण्याकरिता नागरिकांना 'श्री आणि श्रीमती निवासी' यांच्याद्वारे या शुभंकरची मदत होणार असल्याचे श्री. सावे म्हणाले. म्हाडाने नेहमीच बदलत्या काळाशी जुळवून घेत आपल्या कार्यात बदल केले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालत म्हाडाने लोकाभिमुख सेवा ऑनलाइन करत नागरिकांच्या अनेक अडचणी सोडविल्या आहेत तसेच सदनिकांच्या विक्रीकरिता IHLMS २.० ही अत्यंत पारदर्शक संगणकीय सोडत प्रणाली देखील कार्यान्वित केली आहे. याच लोकसेवेच्या पार्श्वभूमीवर एक पाऊल पुढे टाकत म्हाडाचे नवे शुभंकर चिन्ह (मॅस्कॉट) निर्माण केले असल्याचे श्री. सावे यांनी सांगितले.

श्री. सावे यांनी मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, श्री. अजित पवार यांच्या गृहनिर्माण क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत म्हाडाचे शुभंकर नागरिकांना त्यांच्या घरांच्या प्रवासात एक साथीदार म्हणून कार्य करतील. हे शुभंकर म्हाडाच्या योजनांची माहिती सुलभपणे पोहोचवण्याचे एक प्रभावी साधन ठरेल, ज्यामुळे नागरिकांना त्यांच्या निर्णय प्रक्रियेत अधिक मदत होईल.

याप्रसंगी बोलतांना म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) म्हणाले की, म्हाडाचे शुभंकर 'श्री आणि श्रीमती निवासी' हे दाम्पत्य म्हाडाच्या नवीन ओळखीचे प्रतीक असून, ते प्रत्येक नागरिकाच्या घराच्या स्वप्नांना सजीव करतात. हे शुभंकर म्हाडाच्या योजनेबाबत मार्गदर्शन करतील, नागरिकांना त्यांच्या घरासंबंधित समस्यांवर मैत्रीपूर्ण संवादाद्वारे सल्ला देतील, आणि एक विश्वासार्ह मार्गदर्शक म्हणून नागरिकांच्या सोबतीने पुढे जातील. म्हाडाचे शुभंकर नागरिकांच्या घरासंबंधित समस्यांवर मैत्रीपूर्ण मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे, म्हाडाच्या योजनांची आणि सेवांची माहिती नागरिकांना अधिक सुलभतेने मिळेल. 'श्री आणि श्रीमती निवासी' हे शुभंकर म्हाडाच्या उद्दिष्टांची आणि कार्यक्षमतेची मूर्तरूपता आहेत. त्यांच्या माध्यमातून, नागरिकांना सुलभतेने सेवा प्रदान करणे आणि गृहनिर्माण क्षेत्रात उत्कृष्टता साधणे हेच आमचे ध्येय आहे. म्हाडाचा पुढील उद्देश नागरिकांना परवडणाऱ्या दरात घरांची उपलब्धता सुनिश्चित करणे आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, श्री.अजित पवार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली म्हाडाने सदनिकांच्या विक्री करता IHLMS 2.0 ही पारदर्शक संगणकीय सोडत प्रणाली देखील कार्यान्वित केली आहे यामध्ये आपण नोंदणी पासून ते सदनिकेचा ताबा मिळेपर्यंत सर्व गोष्टी ऑनलाईन केल्या आहेत. लोकांपर्यंत जलद गतीने म्हाडा संबंधित माहिती पोहोचवणे आणि त्यांच्याशी जोडून राहण्यासाठी म्हाडाच्या समाज माध्यम व्यासपीठावर सक्रिय आहोत. म्हाडाच्या शुभंकर चिन्हात येत्या काळात चॅटबॉक्सचा देखील अवलंब केला जाईल, असेही श्री. जयस्वाल यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, मुख्य अभियंता-२ श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता-३ श्री. शिवकुमार आडे, उपसचिव गृहनिर्माण विभाग श्री. अजित कवडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार श्री. पी. डी. साळुंखे, कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अनिल अंकलगी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, विधी सल्लागार श्रीमती मृदुला परब, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके, आदी उपस्थित होते.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


निवासी


निवासी

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

Outward No. 3151/48 Dt. 28/08/2024

**Press Release**

# MHADA Announces 10-25% Price Reduction on 370 Houses in Mumbai Board Lottery

Extension of Online Application Deadline Until September 19, 2024

MHADA's Mascot 'Shri and Shrimati Nivasi' Unveiled by Housing Minister Atul Save

Mumbai, August 28, 2024: The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) has announced a price reduction of 10% to 25% on 370 houses available through its Mumbai Board Lottery. This announcement was made today by Housing Minister Atul Save at the unveiling of MHADA's mascot, 'Shri and Shrimati Nivasi,' at the MHADA headquarters.

The 370 apartments, which were acquired through redevelopment projects under DCR 33(5), 33(7), and 58, will now be available at significantly reduced prices. Minister Save detailed the reductions: a 25% cut for the Economically Weaker Section (EWS), 20% for the Low-Income Group (LIG), 15% for the Middle-Income Group (MIG), and 10% for the High-Income Group (HIG). The revised prices will be made available on the official MHADA website and through press releases soon.

To allow more citizens to participate in the lottery, the deadline for online application submissions has been extended until September 19, 2024. The updated schedule for the lottery draw will be announced shortly.

While welcoming MHADA's mascot into the MHADA family, Minister Atul Save said, "This mascot will act as a goodwill ambassador for MHADA. As a citizen-centric organization, MHADA interacts with many people who seek guidance on various processes. In such instances, this mascot, Shri and Shrimati Nivasi, will help citizens understand and navigate MHADA's procedures. MHADA has always adapted to changing times, implementing necessary updates to its operations. By integrating modern technology, MHADA has resolved many issues faced by citizens through online services,

and has also launched the highly transparent IHLMS 2.0 system for apartment sales. Creating these mascots is another step forward in our commitment to public service."

Minister Save also praised the contributions of Chief Minister Eknath Shinde, Deputy Chief Ministers Devendra Fadnavis and Ajit Pawar in the housing sector, stating, "This mascot will serve as a living companion for citizens on their journey to homeownership. They will be an effective tool in making information about MHADA's schemes more accessible, thereby aiding citizens in their decision-making process."

Speaking at the event, MHADA Vice President and CEO, Sanjeev Jaiswal (IAS), said, "MHADA's mascot, 'Shri and Shrimati Nivasi,' symbolize the new identity of MHADA and bring to life the dream of homeownership for every citizen. This mascot will guide people regarding MHADA's schemes, offering friendly advice on housing-related issues and acting as a reliable companion in their journey. The mascot will provide friendly guidance on housing matters, making information about MHADA's schemes and services more easily accessible to the public. 'Shri and Shrimati Nivasi' embody MHADA's goals and efficiency. Through them, our aim is to deliver services more seamlessly and achieve excellence in the housing sector. MHADA's next goal is to ensure the availability of affordable homes to the public."

He added, "Under the guidance of Chief Minister Eknath Shinde, Deputy Chief Ministers Devendra Fadnavis and Ajit Pawar, and Housing Minister Atul Save, MHADA has implemented the IHLMS 2.0, a transparent online lottery system for apartment sales. This system covers everything from registration to possession of the apartment. We are also actively engaged on social media platforms to quickly disseminate information related to MHADA and to stay connected with the public. In the future, chatbox technology will also be integrated into MHADA's mascot system."

The event was attended by key MHADA officials, including Milind Borikar, Chief Officer of Mumbai Board; Milind Shambharkar, Chief Officer of the Mumbai Building Repairs and Reconstruction Board; and Dheerajkumar Pandirkar, Chief Engineer-2, among others.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


================================================================

Outward No. 3151/48 Dt. 28/08/2024

**प्रेस विज्ञप्ती**

**म्हाडा मुंबई मंडल के 370 घरों की कीमतों में 10 से 25 प्रतिशत तक की कटौती -** आवास मंत्री श्री. अतुल सावे

मुंबई मंडल के लिए ऑनलाइन आवेदन की अंतिम तिथि 19 सितंबर तक बढ़ाई गई

म्हाडा के 'श्री और श्रीमती निवासी' शुभंकर का अनावरण आवास मंत्री श्री. अतुल सावे द्वारा

मुंबई, 28 अगस्त, 2024: म्हाडा मुंबई मंडल द्वारा आयोजित कंप्यूटराइज्ड लॉटरी में 2030 घरों की बिक्री के लिए, विकास नियंत्रण नियमावली 33(5), 33(7) और 58 के तहत पुनर्विकास परियोजनाओं से म्हाडा को प्राप्त 370 घरों की कीमतों में लगभग 10 से 25 प्रतिशत तक की कमी की जाएगी, यह जानकारी राज्य के आवास मंत्री श्री. अतुल सावे ने आज दी।

म्हाडा द्वारा नागरिकों से जुड़ने और संवाद को सुगम व पारदर्शी बनाने के उद्देश्य से 'श्री और श्रीमती निवासी' शुभंकर का अनावरण किया गया। इस अवसर पर मंत्री श्री. अतुल सावे ने कहा कि पुनर्विकास परियोजनाओं से प्राप्त 370 घरों को कंप्यूटराइज्ड लॉटरी के माध्यम से बिक्री के लिए पेश किया जाएगा। इनमें से अत्यल्प आय वर्ग के घरों की कीमतों में 25 प्रतिशत, अल्प आय वर्ग के घरों की कीमतों में 20 प्रतिशत, मध्यम आय वर्ग के घरों की कीमतों में 15 प्रतिशत, और उच्च आय वर्ग के घरों की कीमतों में 10 प्रतिशत तक की कमी की जाएगी। इन संशोधित कीमतों को जल्द ही म्हाडा की वेबसाइट और प्रेस विज्ञप्ति के माध्यम से प्रकाशित किया जाएगा।

श्री. सावे ने आगे बताया कि कीमतों में कटौती के बाद अधिक नागरिकों को शामिल करने के लिए मुंबई मंडल के घरों की ऑनलाइन आवेदन प्रक्रिया की अंतिम तिथि को 19 सितंबर, 2024 तक बढ़ा दिया गया है। लॉटरी का संशोधित कार्यक्रम भी जल्द ही मंडल द्वारा घोषित किया जाएगा।

म्हाडा के नए शुभंकर का स्वागत करते हुए श्री. सावे ने कहा कि यह शुभंकर म्हाडा के लिए शुभ संदेश वाहक के रूप में काम करेगा। नागरिकों को म्हाडा की विभिन्न प्रक्रियाओं के बारे में जानकारी और मार्गदर्शन प्रदान करने में यह शुभंकर मददगार साबित होगा।

म्हाडा के उपाध्यक्ष और मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल ने कहा कि 'श्री और श्रीमती निवासी' जोड़े के रूप में, यह शुभंकर म्हाडा की नई पहचान का प्रतीक है। ये नागरिकों के सपनों को साकार करने में मदद करेंगे और एक विश्वसनीय मार्गदर्शक के रूप में उनका साथ देंगे। म्हाडा की सेवाओं और

योजनाओं की जानकारी को अधिक सुगम और प्रभावी ढंग से पहुँचाने का कार्य यह शुभंकर करेगा। इसके साथ ही, म्हाडा का लक्ष्य सस्ते दरों पर घर उपलब्ध कराना है, जिसे IHLMS 2.0 जैसी पारदर्शी कंप्यूटराइज्ड लॉटरी प्रणाली के माध्यम से पूरा किया जा रहा है।

इस अवसर पर मुंबई मंडल के मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडल के मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ श्री. पी. डी. साळुंखे, कोंकण मंडल के मुख्य अधिकारी श्री. अनिल अंकलगी और मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले सहित कई गणमान्य लोग उपस्थित थे।

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण